(१)

# सरप्राईझ

तिच्या आणि त्याच्या दोन वर्षांच्या प्रेमकहाणीची पूर्तता होण्याचा क्षण समीप आला होता. पुढच्या महिन्यात दोघांचं कोर्ट मॅरेज करायचं आणि त्यानंतर एक जंगी पार्टी द्यायची असं तिच्या आई-बाबांनी ठरवलं होतं.

तीन बेडरूमच्या ब्लॉकचं पझेशन मिळालं होतं. तिथलं इंटिरियरही करून झालं होतं. नाही म्हटलं तरी नुसता इंटिरियरचा एकूण सगळा खर्च सव्वा कोटी पर्यंत गेला होता.

खरं तर हे सगळं त्याला स्वतःच्या हिंमतीवर, स्वतःच्या पैशाने करायचं होतं. पण अमेरिकेहून मास्टर्स करून आल्यावर लगेच हे जमलं नसतं.

म्हणून आता तिच्या बाबांनी सर्व पैसे खर्च केले होते. स्वतःच्या एकुलत्या एक मुलीसाठी त्यांना हे जड नव्हतं.

पण त्याला हे मान्य नव्हतं. म्हणून तर ब्लॉक घेताना तो त्याच्या नावावर घेतला होता. सगळे पैसे आपण परत करणार ह्या बोलीवरच केवळ तो ह्या गोष्टीला कबूल झाला होता.

xxxxxxxxxx

दोघांचे आई-बाबा आणि ती दोघं नव्या ब्लॉकमध्ये सामान लावायला आले होते. दोन दिवसांनी गणेशपूजन करायचं ठरलं होतं. तो दोघांच्या आई-बाबांच्या मदतीनं हॉलचं किचनचं सामान लावत होता.

ती मात्र बेडरूम सजवण्यात रमली होती.

xxxxxxxxxx

इंटरकॉमवरून वॉचमनने घाबऱ्या आवाजात काही सांगितलं तेव्हा सगळे हॉलच्या बाल्कनीतून वीसाव्या मजल्यावरून खाली पाहू लागले.

जीवाच्या आकांताने ओरडत तो लिफ्टमधून खाली धावला. रक्ताच्या थारोळ्यातला तिचा मृतदेह पाहून त्याला मूर्छा आली.

xxxxxxxxxx

पुढचे पाच-सहा दिवस तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना तिच्या आई-वडिलांनी पोलिसकेस वगैरे सर्व प्रकरण मिटवलं

पण हा अनपेक्षित हादसा घडल्यामुळे तिच्या आईच्या डोक्यावर परिणाम झाला आणि वडीलांनी कायमचे अंथरूण धरले.

बेडरूमच्या बाल्कनीचा कठडा चांगला चार-साडेचार फूट ऊंच होता, मग असं कसं झालं? हा प्रश्न पुढचे कित्येक आठवडे तरी भेटायला येणारा प्रत्येकजण फिरवून फिरवून विचारत होता.

कुणाच्याच प्रश्नाला उत्तर देण्यात त्याला इंटरेस्ट नव्हता.

××××××××××

नव्या ब्लॉकची एक्स्ट्रा बनवून घेतलेली किल्ली द्यायला इंटिरियर डिझायनर आला तेव्हा ठरवलेल्या ज्यादा कॅशचं पाकिट गुपचुप त्याने पुढे सारलं.

शिकार अचूक साधली होती....

आई-वडिलांसह तो एअरपोर्टला निघाला. मास्टर्स पूर्ण करून त्याची खरी लग्नाची बायको दोन वर्षानंतर आज अमेरिकेहून परत येणार होती. तिला रिसिव्ह करायला ते सर्व निघाले होते.

यू. एस. वरून मास्टर्स करून आल्या आल्या तीन बेडरूमचा सुंदर इंटिरियर केलेला ब्लॉक हे बायकोसाठी सरप्राईज होतं.......!

--------x--------x--------

(पारितोषिक विजेती कथा - कालनिर्णय - दिवाळी अंक २०१८ राज्यस्तरीय कथास्पर्धा)

लीना माटे
मो. ९८७९५३४४२८



चित्र : श्री. प्रकाश देशपांडे